॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com
■ अहिल्यानगर ■ शुक्रवार, दि. २४ एप्रिल २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३३९ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

**✻ सुविचार ✻**
एक चागंली माता
शंभर शिक्षकांच्या मोलाची असते.

## फोडणी


राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### बोलभांड

कोणी कोणावर काही बोला
संयम पुरता सुटला आहे
वादग्रस्त बोलण्यासाठीच
नेत्यांना कंठ फुटला आहे
वाचता येईना तर म्हणे
पुस्तकच आहे वाकडे
वैचारिक वारसा असाच
पुढे नेणार का ही माकडे

# ‘शिवाजी कोण होता’ पुस्तकावरुन वाद!

## पानसरेंचे कसे हाल झाले तसे तुझे..: आ. संजय गायकवाडांची प्रकाशकाला धमकी






**● कोल्हापूर । वीरभूमी –** नेहमीच वादात अडकणारे शिंदे गटाचे नेते आणि बुलढाणाचे आमदार संजय गायकवाड हे आता पुस्तक प्रकाशकाला धमकवत असल्याचे समोर आले आहे. दिवंगत कामगार नेते गोविंद पानसरे लिखित ‘शिवाजी कोण होता’ यावरुन आ. संजय गायकवाड यांनी पुस्तकाचे कोल्हापूरचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना शिवीगाळ केली आहे. तसेच अर्वाच्य भाषेमध्ये आमदार गायकवाड यांची ऑडिओ क्लिप व्हायरल झाली आहे.

यामध्ये आ. संजय गायकवाड यांनी पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना पुस्तकाच्या शिषर्कावरुन जाब विचारला आहे. गायकवाड म्हणाले की, शिवाजी कोण होता’ असे पुस्तकाचं नावं देऊन तुम्ही शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख करता का? गोविंद पानसरे हा कोण हराम XX आहे. शिवाजी महाराजांना शिवाजी म्हणणारा..तुमच्या सारखे नालायक लोक आमच्या शिवाजी महाराजांना एकेरी भाषेमध्ये बोलता, असे आमदार संजय गायकवाड म्हणाले आहेत.

पुढे प्रकाशक प्रशांत आंबी यांनी तुम्ही माहिती घ्या..तुम्ही पुस्तक वाचलं आहे का असे प्रत्युत्तर दिले, यावर आमदार गायकवाड म्हणाले की, पुस्तक वाचण्याची गरज नाही मला. पुस्तक वाचण्याची गरज काय आहे? आम्ही फक्त हे पुस्तक नाही तर पूर्ण इतिहास वाचला आहे. आम्ही मराठा आहे त्यांचं वंशज आहे. तुला माहिती ना पानसरेचे काल हाल झाले, तू ब्राम्हण आहे का? तुझ्या आईबद्दल कोणी असं लिहिलं तर तू प्रकाशित करशील का? लिहून घे तू. मी आमदार संजय गायकवाड तुला घरात घुसून मारेल हरामXX..ये भाडXX..मी धमक्या देत नाही, तुला घरात घुसून मारेलतुझी जीभ छाटेल.. अशा अनेक शिव्या देत आमदार संजय गायकवाड यांनी प्रकाशकाला धमकी दिली. याचा ऑडिओ देखील समोर आला आहे.

नेहमी वादग्रस्त वक्तव्यामुळे चर्चेत असलेल्या शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांचा ऑडिओ व्हायरल झाला आहे. यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी कोल्हापूरतून केली जात आहे.

प्रकाशक प्रकाश आंबी यांनी तुम्ही पुस्तक वाचा किंवा पुस्तकामध्ये काय लिहिले आहे याचा सारांश वाचा असे सांगून देखील आ. संजय गायकवाड थांबले नाहीत. त्यांनी अर्वाच्च भाषेमध्ये शिवीगाळ सुरुच ठेवली. यावरुन आता आमदार गायकवाड यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.



# राहुरी पोटनिवडणुकीसाठी ५६.२० टक्के मतदान

**● राहुरी । वीरभूमी –** भाजपाचे तत्कालिन आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनाने रिक्त झालेल्या राहुरी विधानसभेच्या पोटनिवडणुकीसाठी गुरुवारी ५६.२० टक्के मतदान झाले. सकाळपासूनच मतदारांचा निरुत्साह दिसत होता. दुपारनंतर मतदानाचा टक्का वाढला. मात्र मागील निवडणुकीपेक्षा तब्बल १८ टक्के कमी झालेले मतदान कोणाला फायद्याचे ठरेल हे निकालानंतरच म्हणजे ४ मे रोजी स्पष्ट होणार आहे.

राहुरीची पोटनिवडणूक जाहीर झाल्यानंतर भाजपाने अक्षय कर्डिले यांची उमेदवारी जाहीर केली. त्यातच माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी निवडणुकीतून माघार घेतल्याने राष्ट्रवादी शरद पवार गटाने गोविंद मोकाटे यांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरविले. या प्रमुख उमेदवारांसह वंचितचे संतोष चोळके व चार अपक्ष असे एकुण सात उमेदवारांनी आपले नशिब आजमावले आहे.

उन्हाची तीव्रता लक्षात घेवून प्रशासनाकडून मतदान केंद्रबाहेर मंडप, पिण्याचे पाणी अशी व्यवस्था केली होती. मात्र मतदारांचा निरुत्साह शेवटपर्यंत कायम राहील्याने सुमारे ५६.२० टक्के मतदान झाले. अपवाद वगळता सर्वत्र शांततेत मतदान पार पडले.

## SPOT NEWS

### सप्तशृंगी गडावरील मंदिरातून २२ किलो चांदीची चोरी

**● नाशिक –** महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असलेल्या सप्तशृंगी गडावरील श्री सप्तशृंगी निवासिनी देवी ट्रस्टच्या कारभारातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मंदिरातील नक्षीकामासाठी वापरण्यात आलेल्या चांदीमध्ये सुमारे २२ किलोची तफावत आढळली असून, या ‘चांदी अपहार’ प्रकरणाने संपूर्ण राज्यभरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत नाशिक विभागीय आयुक्त कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालयाने सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. जुन्या नोंदींनुसार, मंदिरातील नक्षीकामासाठी ४०६ किलो चांदी वापरण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्ष मोजणी केली असता केवळ ३८३ किलो ७०३ ग्रॅम चांदी उपलब्ध असल्याचे आढळले. अशा प्रकारे सुमारे २२ किलो ४९० ग्रॅम चांदी गायब असल्याचे उघड झाले आहे.

### राज्य शिखर बँक गैरव्यवहार प्रकरणाला पूर्णविराम

**● मुंबई –** राज्याची शिखर बँक असलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (एमएससीबी) घोटाळ्याशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणातून राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) आमदार रोहित पवार यांना विशेष सत्र न्यायालयाने दोषमुक्त केले. त्यामुळे या प्रकरणाला आता पूर्णविराम मिळाला आहे.

# २४ ते २५ एप्रिल दरम्यान वादळी पावसाचा ‘येलो अलर्ट’; नागरिकांनी सतर्क राहावे

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** भारतीय हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार जिल्ह्यात दि. २४ ते २५ एप्रिल २०२६ या कालावधीत काही ठिकाणी जोरदार वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यासाठी ‘येलो अलर्ट’ जारी करण्यात आला असून नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.

मेघगर्जना, वीज चमकत असताना अथवा वादळी वाऱ्याच्या वेळी झाडाखाली किंवा झाडाजवळ उभे राहू नये तसेच वीजवाहक तारांपासून सुरक्षित अंतर राखावे. घराबाहेर पडताना इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर टाळावा व लोखंडी वस्तूंशी संपर्क टाळावा.

मोकळ्या मैदानात, शेतात किंवा उंच ठिकाणी उभे राहणे टाळावे. विजेच्या खांब, ट्रान्सफॉर्मर, टॉवर, धातूचे कुंपण यापासून दूर राहण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. तसेच घरावरील सैल पत्रे (होर्डिंग), झाडांच्या फांद्या यांची पडझड होऊ नये यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात.

वीज कडकडाटाच्या वेळी सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा. जमिनीवर बसताना गुडघे वाकवून डोके खाली ठेवावे आणि शक्यतो जमिनीशी थेट संपर्क कमी ठेवावा, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# मिरजगावात पोलिस कर्मचारी लाचेच्या जाळ्यात

## जुगार क्लब सुरळीत सुरु ठेवण्यासाठी घेतली ५ हजारांची लाच

**● मिरजगाव । वीरभूमी –** कर्जत तालुक्यातील मिरजगाव पोलिस ठाण्याचे कर्मचारी दीपक पवार यांनी परिसरातील एका जुगार क्लब चालकाकडून क्लब सुरळीत चालू ठेवण्यासाठी पाच हजार रुपयांची लाच मागीतली होती. याबाबत संबधित व्यक्ती अहिल्यानगर लाचलुचपत विभागाकडे लेखी तक्रार दिली होती. या तक्रारीची पडताळणी केल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधकच्या पथकाने गुरुवारी सापळा लावून रंगेहात पकडले. या कारवाईने पोलिस दलात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत समजलेली माहिती अशी की, मिरजगाव परिसरात चालणाऱ्या जुगार क्लबच्या चालकांकडे क्लब सुरळीत सुरु ठेवण्यासाठी पाच हजार रुपयांची लाच मागीतली होती. यानंतर संबधित व्यक्तीने अहिल्यानगर लाचलुचपत विभागाकडे लेखी तक्रार केली होती. या तक्रारीची पडताळणी करुन लाचलुचपतच्या पथकाने गुरुवारी सापळा लावून पोलिस कर्मचारी दीपक पवार यास तक्रारदाराकडून पाच हजार रुपये घेतांना रंगेहात पकडून कारवाई केली.

ही कारवाई अहिल्यानगर लाचलुचपतचे उपविभागिय पोलिस अधिकारी अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पो. हे. कॉ. संतोष शिंदे, बाबासाहेब कऱ्हाड, रवी निमसे, चालक हरुन शेख यांच्या पथकाने केली. पथकाने आरोपीला ताब्यात घेवून पुढील कायदेशिर कारवाई केली.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सरकारी व निमसरकारी कर्मचाऱ्यांकडून जागरण गोंधळ

## सरकारी कर्मचाऱ्यांचा संप तिसऱ्या दिवशीही सुरु । प्रलंबित मागण्यांवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** राज्यातील सरकारी, निमसरकारी कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी संपावर असून, या संपाच्या तिसऱ्या दिवशी गुरुवारी (दि. २३ एप्रिल) अहिल्यानगर जिल्हा राज्य सरकारी, निमसरकारी कर्मचारी, मुख्याध्यापक व शिक्षक संघटना समन्वय समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ‘जागरण गोंधळ’ आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाद्वारे शासनाने तातडीने प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढावा, अन्यथा संप अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला.

गुरुवारी सकाळपासूनच जिल्हाधिकारी कार्यालय परिसर संबळ, ढोलकीच्या गजराने दणाणून गेला होता. गोंधळी मंडळींनी पारंपरिक पद्धतीने जागरण करत आंदोलनाला वेगळा रंग दिला. गोंधळाला या... गोंधळाला या... अशा गीतांसह आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

या आंदोलनात समन्वय समितीचे निमंत्रक रावसाहेब निमसे, सरकारी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, विलास पेद्राम, वंदना नेटके, विजय काकडे, भागवत नवगण, अशोक मासाळ, शंकर जगताप, भाऊ शिंदे, वैशाली बोडखे, पुरुषोत्तम आडेप, विलास पेद्राम, संदिपान कासार, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रा. सुनिल पंडित, माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष सचिन झगडे, शिक्षकेतर संघटनेचे संदीप पानमळकर, महानगर माध्यमिक शिक्षक संघाचे शहराध्यक्ष उद्धव गुंड, जीएसटी विभागाच्या वर्षा पारधी, दिपक चन्ने, प्रसाद सामलेटी, उषा पारधी, आप्पासाहेब जगताप, प्रसाद साठे, संतोष कार्ले, अमोल ठाणगे, सुधीर लाड, प्रमोद सूर्यवंशी, दिगंबर कर्पे, प्रमोद जोशी, शंकर जगताप, दुर्गा हरेल, कविता लोखंडे, शुभांगी खरात, अश्विनी खरपुडे, गंगासागर उगले, अनिता पवार, अमोल ठाणगे, बाळासाहेब निवडुंगे, भगवान सानप, सुषमा उमाप, सौ. सुतार, श्रीमती ज्योती दांगट, राहुल कोळेकर, नाड भाऊसाहेब आदींसह मोठ्या संख्येने कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.



आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले की, विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे वारंवार लक्ष वेधूनही त्यावर कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्यामुळे हा संप पुकारण्यात आला आहे. प्रमुख मागण्यांमध्ये जुनी पेन्शन योजना लागू करणे, निवृत्तीचे वय ६० वर्षे करणे, रिक्त पदे तात्काळ भरणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करणे, चतुर्थश्रेणी व वाहनचालक भरतीवरील बंदी उठवणे, सर्व कर्मचाऱ्यांसाठी कॅशलेस आरोग्य विमा योजना लागू करणे यांचा समावेश आहे. तसेच केरळ राज्याच्या धर्तीवर ५ लाख रुपयांपर्यंत कॅशलेस आरोग्य विमा योजना महाराष्ट्रात लागू करावी, अशा एकूण १८ मागण्या शासनाकडे करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, या संपामुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील बहुतांश कामकाज ठप्प झाले असून, निवडणूक कामकाज वगळता इतर सर्व विभागांवर परिणाम झाला आहे. अनेक शाळांमधील शिक्षक संपात सहभागी झाल्यामुळे शैक्षणिक कामकाजावरही मोठा परिणाम जाणवत आहे. सरकारने तातडीने सकारात्मक भूमिका घेऊन मागण्यांवर निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा समन्वय समितीच्या वतीने देण्यात आला आहे.

# SPOT NEWS

## अहिल्यानगर जिल्हा अंडर-२० फुटबॉल संघ लोणावळा येथील स्पर्धेसाठी रवाना

**● अहिल्यानगर I वीरभूमी-**

अहिल्यानगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन (एडीएफए) तर्फे अंडर-२० फुटबॉल संघाची लोणावळा येथे होणाऱ्या आंतरजिल्हा स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. ही स्पर्धा २१ ते २८ एप्रिल २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. संघाचे प्रशिक्षक सचिन पाथरे असून राजेश अँथनी हे संघ व्यवस्थापक म्हणून जबाबदारी सांभाळणार आहेत. संघाने स्पर्धेसाठी चांगली तयारी केली असून खेळाडूंकडून उत्कृष्ट कामगिरीची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. या निमित्ताने एडीएफएचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी संघाला शुभेच्छा देत खेळाडूंनी आत्मविश्वासाने आणि जिद्दीने खेळ करून जिल्ह्याचे नाव उंचावावे, असे आवाहन केले. अशा स्पर्धांमुळे युवा खेळाडूंना आपली गुणवत्ता दाखवण्याची संधी मिळते, असे त्यांनी नमूद केले. वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, उपाध्यक्ष खालिद सय्यद, जोगासिंग मिन्हास आणि अमरजीत सिंग शाही यांनी देखील संघातील खेळाडू व प्रशिक्षकांना शुभेच्छा दिल्या. सचिव रोनप फर्नांडिस, संयुक्त सचिव प्रदीप जाधव व व्हिक्टर जोसेफ, राजू पाटोळे यांनी संघाच्या तयारीचे कौतुक करत स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. खजिनदार ऋषिपाल सिंग परमार व सहायक खजिनदार रणबीर सिंग परमार यांनी देखील संघाला पाठिंबा दर्शवला. एडीएफएचे च्या सर्व कार्यकारिणी सदस्यांनी संघाला या स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या असून संघाकडून उत्कृष्ट कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली आहे. अहिल्यानगर अंडर-२० संघ स्पर्धेत दमदार कामगिरी करून जिल्ह्याचा गौरव वाढवेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. अहिल्यानगर जिल्हा संघ पुढीलप्रमाणे- साहिल कुसाळकर (कर्णधार), आदित्य गुगळे (उपकर्णधार), याह्या सय्यद, पियुष भोसले, जोएल पाथरे, नील धेंडवाल, झैद शेख, प्रद्युम मोरे, आदित्य तळेकर, वेदांत क्षत्रिय, ओम म्हस्के, उत्कर्ष सोनावणे, पार्थ मस्कर, अभय थोरात, प्रतीक शिंदे, प्रणव पंडित, अमर शेख, परेश म्याना.

## लक्ष्यवेध राज्यस्तरीय परीक्षेत लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेचे यश

**● अहिल्यानगर I वीरभूमी-**

रयत शिक्षण संस्था संचलित कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेने 'लक्ष्यवेध' राज्यस्तरीय परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत आपल्या शैक्षणिक गुणवत्तेची छाप उमटवली. शाळेतील तब्बल ८९ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवत शाळेचा नावलौकिक उंचावला आहे. यामध्ये २७ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत, तर ४३ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत आणि १९ विद्यार्थी केंद्र गुणवत्ता यादीत झळकले आहेत. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करुन गौरव करण्यात आला. हा कार्यक्रम रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी डॉ. निक्रड, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर, पालक संघाचे सदस्य कैलास गुंजाळ तसेच शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात ज्ञानदेव पांडुळे यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करताना शिस्त, सातत्य आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच हे यश शक्य झाल्याचे स्पष्ट केले. गुणवंत विद्यार्थ्यांना वर्गशिक्षिका मीनाक्षी खोडदे, उर्मिला साळुंके, सुजाता दोमल, शितल रोहकले, रुपाली वाबळे, सौ. अनभुले, जयश्री खांदोडे, इंदुमती दरेकर, कांचन मदने, पूनम धाडगे, रूपाली पांडुळे यांचे मार्गदर्शन लाभले.

# कुत्रे, गाई-म्हशींसह 'प्रहार'चे जलसंधारण विभागात आंदोलन

### अधिकाऱ्यांच्या दालनात सोडले कुत्रे व जनावरे I एरंडोली तलावाचे रखडलेले काम त्वरीत सुरु करण्याची मागणी

**● अहिल्यानगर I वीरभूमी –**

एरंडोली (ता. श्रीगोंदा) येथील साठवण तलावाचे काम गेल्या तीन वर्षांपासून रखडल्याच्या निषेधार्थ प्रहार जनशक्ती संघटना व ग्रामस्थांच्या वतीने जलसंधारण विभागाच्या कार्यालयात थेट कुत्रे, गाई व म्हशींसह ठिय्या आंदोलन करत प्रशासनाच्या दिरंगाईविरोधात संताप व्यक्त करण्यात आला. यावेळी प्रशासनाला धारेवर धरुन साठवण तलावाचे काम त्वरीत सुरु करण्याची मागणी करण्यात आली. अचानकपणे कार्यालयात आलेले कुत्रे आणि जनवारांमुळे अधिकारी व कर्मचारी गडबडले.



प्रहार जनशक्तीचे जिल्हा समन्वयक विजय भंडारे व जिल्हाध्यक्ष विनोदसिंग परदेशी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात जिल्हा उपाध्यक्ष पप्पूशेठ जेवले, अविनाश ठाणगे, तालुकाध्यक्ष नानासाहेब पाडते, एरंडोली गावातील सागरभाऊ जठार, भाऊसाहेब बनकर, अण्णासाहेब सोनवणे, नारायणभाऊ भंडारे, राहुल इथापे, राहुल जगताप, सोनवणे, सतीश मोरे, प्रकाश मोरे, राजेंद्र जठार, जयसिंग शेलार, संपत मोरे, विठ्ठल भंडारे, भास्कर भंडारे, संदीप भंडारे, किशोर भंडारे, रणधीर भंडारे, सागर जठार आदींसह संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ सहभागी झाले होते.

१९७२ च्या दुष्काळात बैलगाडीच्या साहाय्याने एका वर्षात पूर्ण झालेल्या तलावाच्या कामाला आजच्या आधुनिक युगात ३६ महिने उलटूनही पूर्ण करता आले नाही, ही अत्यंत खेदजनक बाब असल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले. इतकी यंत्रसामग्री, कोट्यवधींचा निधी असूनही काम 'जैसे थे' आहे, असा आरोप करण्यात आला.

या तलावासाठी ५ कोटी रुपयांहून अधिक निधी मंजूर असूनही काम ठप्प आहे. पोकलेन, जेसीबीसारखी यंत्रणा उपलब्ध असतानाही प्रशासनाने कामाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला. काही स्थानिक अतिक्रमणाचे कारण पुढे केले जात असले तरी त्यावर ठोस कारवाई होत नसल्याने प्रश्न अधिकच चिघळला आहे.

जिल्हाध्यक्ष विनोदसिंग परदेशी म्हणाले की, गेल्या चार महिन्यांपासून आम्ही गांधीगिरीच्या मार्गाने पाठपुरावा करत आहोत, मात्र अधिकारी झोपेचे सोंग घेत आहेत. आता ही झोप मोडावी लागेल. आज आम्ही कुत्रे घेऊन आलो आहोत; उद्या कामचुकार अधिकाऱ्यांच्या मागे हीच कुत्री सोडावी लागली तरी मागे हटणार नसल्याचे सांगितले.

विजय भंडारे म्हणाले की, पावसाळा तोंडावर असताना तलावाचे काम अपूर्ण असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना जनावरांना पिण्यासाठी पाणी नसल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत बिकट असून शेती उत्पन्न घटलेले आहे आणि प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे गावकरी अक्षरशः हवालदिल झाले आहेत. प्रशासनाने मोजणीसाठी पुढील महिन्याची तारीख दिली असली, तरी ती मान्य नसून तातडीने आणि पोलीस बंदोबस्तात मोजणी करण्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले.

ही लढाई कोणत्याही वैयक्तिक स्वार्थासाठी नसून शेतकरी व ग्रामस्थांच्या न्यायासाठी आहे, असे सांगत आंदोलनकर्त्यांनी संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचा दाखला देत आक्रमक भूमिका घेतली. गरज पडली तर जेलमध्ये जावे लागले तरी चालेल, पण तलावाचे काम पूर्ण होईपर्यंत आंदोलन थांबणार नाही, असा निर्धार व्यक्त करण्यात आला. सदर मागणीचे निवेदन जलसंधारण विभागाचे प्रभारी कार्यकारी अभियंता यांना देण्यात आले.

## प्रा. आनंद घोंगडे यांना अर्थशास्त्र विषयात पीएच. डी. पदवी प्रदान

**● अपाथर्डी I वीरभूमी –**

येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयाचे प्रा.आनंद घोंगडे यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांचेकडून पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी अर्थशास्त्र या विषयात डॉ. दिलीप मिसाळ यांच्या मार्गदर्शनखाली अहमदनगर जिल्ह्यातील अग्रणी बँक योजनेचे ग्रामीण विकासातील योगदान: चिकित्सक अभ्यास या विषयावर संशोधन प्रबंध विद्यापीठात सादर केला. या संशोधनाचा उपयोग ग्रामीण भागातील सामान्य शेतकरी, शेतमजूर आणि कारागीर, स्वयंसहायता महिला बचतगट या सर्वांना होणार आहे. या संशोधनामध्ये बँकिंग सेवा या केवळ शहरा पुरत्याच मर्यादित आहेत की, त्या खऱ्या अर्थाने खेड्यापर्यंत पोहचल्या याचेही विश्लेषण करण्यात आले आहे.




प्रा.आनंद घोंगडे हे मागील २० वर्षापासून बाबुजी आव्हाड महाविद्यालयात कार्यरत असून त्यांचे अर्थशास्त्र विषयाशी निगडीत विविध विषयांवर संशोधनपर लेख प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व पाथर्डीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपाध्यक्ष सुरेशराव आव्हाड, प्राचार्य डॉ. बबन चौरे, एस. आर. सांगडे, मार्गदर्शक डॉ. दिलीप मिसाळ, डॉ. डी. बी. पवार व महाविद्यालयीन प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## शिर्डीत होणाऱ्या राष्ट्रसंत गाडगेबाबा साहित्य संमेलनात 'जीवनदीप गाडगेबाबांचा' कवितासंग्रहाचे प्रकाशन

**● शिर्डी I वीरभूमी-**

२८ वे राष्ट्रसंत गाडगेबाबा मराठी साहित्य संमेलन यावर्षी शिर्डी येथे संमेलनाध्यक्ष राजेंद्र फंड यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून डॉ. शंकर घनश्यामदास अंदानी (पुणे) उपस्थित राहणार आहेत. संमेलनाचे उद्घाटन प्रसिद्ध कादंबरीकार डॉ. श्रीकांत श्रीपती पाटील यांच्या हस्ते होणार आहे.

प्रमुख पाहुणे म्हणून सौ. सुमन गजानन देसाई (मुंबई), डॉ. शिवाजी शिंदे, डॉ. प्रसाद बाविस्कर, प्रा. किसनराव कुऱ्हाडे तसेच माया नवथर उपस्थित राहणार आहेत. या संमेलनात विविध पुस्तकांचे प्रकाशन करण्यात येणार असून, संमेलनाध्यक्ष तथा डेबूजी प्रतिष्ठानचे संस्थापक कवी राजेंद्र फंड यांच्या 'गाडगेबाबा यांच्या जीवनपटावर आधारित' 'जीवनदीप गाडगेबाबांचा' या कवितासंग्रहाचे प्रकाशन होणार आहे.




या कवितासंग्रहाचे प्रकाशन भारतीय धोबी महासंघाचे राष्ट्रीय वरिष्ठ उपाध्यक्ष एकनाथराव बोरसे, महाराष्ट्र राज्य धोबी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष देवराव सोनटक्के, डॉ. एकनाथराव ढाकणे, शब्दगंध साहित्यिक परिषदेचे संस्थापक सचिव सुनील गोसावी तसेच कादंबरीकार श्रीकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

यावेळी या कवितासंग्रहातील निवडक कवितांचे गायन राष्ट्रीय भारुडकार हमीद सय्यद सादर करणार आहेत. या संमेलनाच्या आयोजनासाठी कवी सरकार, डेबूजी प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुनील निकम, माधवराव देसाई, सुधाकर वाघ, अनिल देसाई, विलासराव रोकडे तसेच राजश्री फंड हे नियोजन करत आहेत.

# 'एक मुठ धान्य अनाथांसाठी' उपक्रम दरवर्षी राबवावा

### मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी I अग्रीपंख फौंडेशनचा कृतज्ञता सोहळ्यात ७२ शाळांचा सहभाग, दहा शाळांचा सन्मान

**● श्रीगोंदा I वीरभूमी-**

स्व. अजित पवार यांच्या नेतृत्वात विकासाची दृष्टी आणि सामान्य माणसांच्या समस्या जाणून घेण्याची संवेदनशीलता होती. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अग्रीपंख फौंडेशनतर्फे राबविण्यात आलेला 'एक मुठ धान्य अनाथांसाठी' हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद आहे. भविष्यात मुलांमध्ये दातृत्वाची भावना निर्माण करण्यासाठी आणि वंचितांना आधार देण्यासाठी हा उपक्रम दरवर्षी तसेच शाळास्तरावर राबविणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले.

अग्रीपंख फौंडेशनतर्फे गुरुवारी 'एक मुठ धान्य अनाथांसाठी' या उपक्रमात सहभागी झालेल्या ७२ शाळांच्या कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त शिक्षक भाऊसाहेब वाघ होते.

या प्रसंगी सहभागी सर्व शाळांना उपयुक्त भेटवस्तू देण्यात आल्या. तसेच दहा शाळांना सन्मानपत्र व प्रत्येकी एक सायकल देऊन गौरविण्यात आले.

आनंद भंडारी पुढे म्हणाले की, शाळा, विद्यार्थी, खेळाडू आणि भारतीय जवान यांना प्रोत्साहन देण्याची अग्रीपंख फौंडेशनची संकल्पना प्रेरणादायी आहे. सोशल मीडियाचा वापर कमी करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण होणे आवश्यक असून, त्यासाठी प्रत्येक शाळेत वाचनालय उभारले गेले पाहिजे.

प्राथमिक विभागाचे जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी सांगितले की, अग्रीपंख फौंडेशन सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने शाळांना आधार देत उत्तम कार्य करत आहे. तर माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांनी शिवरायांनी हिंदवी स्वराज्याची शपथ घेतलेल्या रायरेश्वर गडावर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची सुंदर इमारत उभारण्यासारख्या उपक्रमांची गरज अधोरेखित केली.

यावेळी उद्योजक संजयकुमार मचे, प्रविण शिंदे, रामदास झेंडे, डी. डी. भुजबळ, विकास पाटील, आबासाहेब जगताप आदींनीही आपले मनोगत व्यक्त केले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक अग्रीपंख फौंडेशनचे विश्वस्त दिलीपराव काटे यांनी केले. यावेळी तहसीलदार सचिन डोंगरे, गटविकास अधिकारी राणी फराटे, गटशिक्षणाधिकारी कुसुमकुमारी कानडी, संदीप सोमवंशी, किसन वऱ्हाडे, एन. टी. शेलार, अंकुश घाडगे, गोपाळराव डांगे, भावना मोहीते आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन विशाल चव्हाण यांनी केले, तर आभार राजकुमार इथापे यांनी मानले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीतील गैरव्यवस्थेची चौकशीची मागणी

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शहरात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमातील गैरव्यवस्थेबाबत भीमशक्तीच्या वतीने मनपा आयुक्तांना निवेदन देण्यात आले. संस्थापक अध्यक्ष चंद्रकांतजी हंडोरे यांच्या मार्गदर्शनाखाली शहर जिल्हाध्यक्ष संजय जगताप यांनी हे निवेदन सादर केले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, दि. १४ एप्रिल २०२६ रोजी मार्केट यार्ड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील स्मारक परिसरात शासकीय स्वरूपाचा जयंती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मात्र, या कार्यक्रमासाठी करण्यात आलेली व्यवस्था अत्यंत निकृष्ट दर्जाची होती. स्मारक परिसराची रंगरंगोटी व स्वच्छता योग्य पद्धतीने करण्यात आलेली नव्हती. तसेच दरवर्षीप्रमाणे पुतळ्यास पुष्पसजावटही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले. याशिवाय, कार्यक्रमासाठी दरवर्षी हजारो अनुयायी उपस्थित राहत असताना यंदा बैठक व्यवस्थाही अपुरी व विस्कळीत होती. त्यामुळे उपस्थित नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयींचा सामना करावा लागला. विशेष म्हणजे, यंदा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याची रंगरंगोटी देखील करण्यात आलेली नव्हती, ही बाब अधिक खेदजनक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या वेळी शहर जिल्हाध्यक्ष संजय जगताप, जिल्हा सचिव पोपटराव जाधव, शहर सचिव विशाल भिंगारदिवे, शहर उपाध्यक्ष अभय गायकवाड, अशोक खंडागळे, भाऊसाहेब भिंगारदिवे आदी उपस्थित होते.

## नागापूर जिल्हा परिषद शाळेचे चाँद शेख यांना पुरस्कार जाहीर

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल नागापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक चाँद हुसेन शेख यांना यंदाचा 'छत्रपती संभाजी महाराज गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित सहाव्या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांनी दिली.

## सौ. मीना बुब यांचे निधन

**● अकोले । वीरभूमी–**



येथील उद्योजक विजय बुब यांच्या पत्नी सौ. मीना बुब (वय ६८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर अकोले येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. स्व. मीना बुब यांच्या मागे पती विजय बुब, मुलगा प्रा. गोपाल बुब (अकोले महाविद्यालय), मुलगी सौ. राणी भट्टड (सातारा), सुन, नातवंडे, दिर, पुतण्या असा मोठा परिवार आहे. हिंद सेवा मंडळाचे माजी संचालक, प्रथित यश व्यापारी तथा सामाजिक कार्यकर्ते सतिश बुब यांच्या त्या भावजई होत.

# माजी आ. विजय औटींच्या घरासमोर जोरदार घोषणाबाजी

### सेनापती बापट पतसंस्थेच्या संचालकांविरोधात पारनेरमध्ये संतापाचा उद्रेक! पोलीस व तहसीलदार यांना ठेवीदारांचे निवेदन

**● पारनेर । वीरभूमी –**

आपल्या आयुष्याची पुंजी आणि घामाचा पैसा सेनापती बापट मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीमध्ये अडकल्याने संतप्त झालेल्या शेकडो ठेवीदारांनी पारनेर शहरात आक्रमक पवित्रा घेतला. गुरुवार, २३ एप्रिल रोजी सकाळी १० वाजेपासूनच तालुक्यातील विविध भागांतून ५०० ते ८०० ठेवीदार पारनेरच्या बाजार तळावर एकत्र जमले होते. या ठिकाणी सर्वांनी एकत्रित येत संस्थेचे संस्थापक व माजी आमदार विजयराव औटी यांच्या विरोधात एल्गार पुकारला.




बाजार तळावरून या आंदोलकांनी पारनेरच्या मुख्य बाजारपेठेतून एक भव्य रॅली काढली. या रॅलीदरम्यान आमचे पैसे आम्हाला मिळालेच पाहिजेत आणि संचालक मंडळाचा निषेध असो अशा घोषणांनी संपूर्ण शहर दणाणून गेले होते. ही रॅली थेट माजी आमदार विजयराव औटी यांच्या बंगल्यासमोर पोहोचली. तेथे संतप्त ठेवीदारांनी जोरदार निदर्शने केली आणि बंगल्यासमोरच ठिय्या मांडला. संस्थापक विजय औटी, संस्थेचे अध्यक्ष रामदास भोसले, मुख्य कार्यकारी संचालक रामदास झंजाड यांच्यासह संपूर्ण संचालक मंडळाला तात्काळ अटक करण्यात यावी, अशी मागणी यावेळी आंदोलकांनी लावून धरली.

पोलीस प्रशासनाने गुन्हा दाखल करूनही आरोपी अद्याप मोकाट फिरत असल्याबद्दल ठेवीदारांनी तीव्र संताप व्यक्त केला. अनेकांच्या मुलांचे शिक्षण, मुलींची लग्ने आणि वृद्धांच्या औषधोपचाराचा पैसा या संस्थेत अडकल्याने ठेवीदारांवर उपासमारीची वेळ आली आहे. ही परिस्थिती मांडत असताना अनेक ठेवीदारांना अश्रू अनावर झाले होते. केवळ आश्वासने नको तर प्रत्यक्ष कारवाई करा, असा पवित्रा घेत ठेवीदारांनी पारनेर तहसील कार्यालय आणि पोलीस प्रशासनाकडे धाव घेतली.

प्रशासनाला सादर केलेल्या निवेदनात ठेवीदारांनी मागणी केली आहे की, या घोटाळ्याचे तात्काळ फॉरेन्सिक ऑडिट करण्यात यावे आणि संस्थेसह सर्व माजी व विद्यमान संचालकांच्या वैयक्तिक मालमत्ता जप्त कराव्यात. या मालमत्तांच्या लिलावातून ठेवीदारांची देणी परत करण्याची प्रक्रिया सुरू करण्याची विनंती त्यांनी केली. तसेच गृह विभागाने या संस्थेवर प्रशासकाची नियुक्ती करावी, असेही निवेदनात नमूद केले आहे.

सकाळपासून सुरू झालेले हे आंदोलन दुपारपर्यंत सुरू होते. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पारनेर पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला होता. तहसीलदारांनी ठेवीदारांच्या मागण्यांचे निवेदन स्वीकारून त्यावर योग्य कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र, जर येत्या काही दिवसांत दोषींना अटक झाली नाही आणि पैसे मिळण्याची प्रक्रिया सुरू झाली नाही, तर हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा संतप्त ठेवीदारांनी दिला आहे. या आंदोलनामुळे पारनेर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.

## मोडी लिपी तज्ञ पॅनलसाठी डॉ. राजेश बाराते यांची निवड

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयातर्फे मोडी लिपीतील मजकुराचे मराठीत लिप्यंतर तसेच इंग्रजीत अनुवाद करण्यासाठी तज्ञांची नामिका (पॅनल) तयार करण्याच्या उद्देशाने घेण्यात आलेल्या लेखी व मौखिक परीक्षेत प्रा. डॉ. राजेश मधुकर बाराते यांनी यश संपादन केले आहे.



डॉ. बाराते हे श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात गेल्या १३ वर्षांपासून अध्यापन करत असून त्यांनी इतिहास विषयात नेट व पीएचडी पदवी प्राप्त केली आहे. त्यांच्या नावावर अनेक संशोधन लेख प्रकाशित आहेत. तसेच त्यांना सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. सन २०२३ पासून ते महाराष्ट्र शासनाचे प्रमाणित मोडी लिप्यंतरक म्हणून कार्यरत आहेत.

श्रीगोंदा परिसरातील पेडगाव येथील धर्मवीरगड दुर्गाच्या संवर्धन व संशोधनात त्यांचे विशेष योगदान आहे. स्थानिक इतिहासाच्या अभ्यासासाठी त्यांनी प्राचीन मोडी लिपी आत्मसात केली आहे.

पुणे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार दौंड तहसील कार्यालयात मोडी लिपीतील कुणबी नोंदींचे संशोधन व लिप्यंतराचे कार्यही त्यांनी केले आहे. याशिवाय विद्यार्थ्यांसाठी मोडी लिपीचे प्रशिक्षण वर्ग आयोजित करून ते प्रशिक्षक म्हणूनही कार्य करत आहेत.

या यशामुळे डॉ. बाराते यांना महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत पॅनलवर काम करण्याची संधी मिळणार असून ही अत्यंत अभिमानाची बाब मानली जात आहे. त्यांच्या या यशामध्ये संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे, अनुराधा नागवडे, प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी, निरीक्षक सचिन लगड तसेच सर्व विश्वस्त, प्राध्यापक व सहकारी मित्र यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## पठारवाडी येथील न्यू इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये जादूगार प्रकाश शिरोळे यांचे 'जादूचे प्रयोग' कार्यक्रम उत्साहात

**● निघोज । वीरभूमी–**




पारनेर तालुक्यातील पठारवाडी (निघोज) येथील श्री बाबासाहेब कवाद सेवाभावी संस्थेच्या न्यू इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध जादूगार प्रकाश शिरोळे यांच्या 'जादूच्या प्रयोगांचे' आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना मनोरंजनासोबत विज्ञानाची गोडी लावण्याचा प्रयत्न करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेचे अध्यक्ष शांताराम कळसकर, उपाध्यक्ष प्रकाश कवाद, सचिव वसंत कवाद, प्राचार्य डायस सर, व्यवस्थापिका सौ. संगीता कवाद तसेच कॉर्डिनेटर मोनिका डायस यांच्या उपस्थितीत पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शांताराम कळसकर होते.

यावेळी कळसकर यांनी संस्थेच्या वतीने भविष्यातही शिक्षणाबरोबरच मनोरंजन व वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविणारे विविध उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला.

व्यवस्थापिका सौ. संगीता कवाद यांनी जादूगार प्रकाश शिरोळे व गीतकार अरुण वाळुंज यांचा सन्मान केला. मनोरंजनातून शिक्षण देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला चालना देणारा असल्याचे त्यांनी नमूद केले.

जादूगार प्रकाश शिरोळे यांनी आपल्या बहारदार प्रयोगांनी विद्यार्थ्यांची मने जिंकली. चेंडूच्या कसरती, कानातून रुमाल काढणे यांसारख्या प्रयोगांनी विद्यार्थी आश्चर्यचकित झाले आणि टाळ्यांचा कडकडाट केला. विशेष म्हणजे, काही विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोगात सहभागी करून घेत त्यांनी जादूच्या छोट्या क्लृप्त्याही शिकवल्या.

कार्यक्रमाचे संयोजक गीतकार अरुण वाळुंज यांनी जादू ही कोणतीही दैवी शक्ती नसून हातचलाखी व विज्ञानाचा सुंदर संगम असल्याचे स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. प्राजक्ता औटी यांनी केले, तर आभार प्रदर्शन सौ. राजश्री वारे यांनी मानले.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

# आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहात संस्कारक्षम पिढी घडविण्याचा उपक्रम

### व्याख्याते बाळासाहेब देशपांडे । उन्हाळी कला, क्रीडा व बालसंस्कार शिबिराचे उद्घाटन

**● शेवगाव । वीरभूमी –**

उन्हाळी कला, क्रीडा व बालसंस्कार शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थी दशेतच बालकांवर संस्कार करणारी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूह ही एकमेव संस्था असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते बाळासाहेब देशपांडे यांनी केले.

चापडगाव येथील चापडगाव हायस्कूलमध्ये आयोजित शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय शिक्षण विभाग प्रमुख प्रा. सौ. वंदना पुजारी होत्या.

आपल्या व्याख्यानात देशपांडे पुढे म्हणाले की, विद्यार्थी तणावमुक्त राहावा, त्याच्यामध्ये आई-वडील व गुरुजनांची सेवा करण्याचे संस्कार निर्माण व्हावेत आणि भविष्यात तो देशाचा उत्तम नागरिक घडावा, यासाठी अशा उपक्रमशील व संस्कारक्षम संस्थांचे मोठे योगदान आहे.

विद्यार्थ्यांनी दररोज सकाळी उठल्यानंतर वडीलधाऱ्यांना नमस्कार करावा, महान व्यक्तींची चरित्रे वाचावीत, स्वतःचे वर्तन आदर्श ठेवावे आणि शारीरिक विकासाकडे लक्ष द्यावे. घर, शाळा, परिसर व गाव स्वच्छ ठेवण्यासाठी स्वतःपासून प्रयत्न सुरू करावेत. मोबाईल व टीव्हीपासून दूर राहून अभ्यासाला अधिक वेळ द्यावा. या पंचसूत्रीचा अवलंब केल्यास संस्कारक्षम पिढी घडू शकते, असे त्यांनी सांगितले. तसेच जीवनात प्रार्थनेचे महत्त्वही त्यांनी सोदाहरण स्पष्ट केले.

या कार्यक्रमात योगाचार्य प्रा. लक्ष्मण नलवडे यांनी योग, प्राणायाम, सूर्यनमस्कार व ध्यानधारणेचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांकडून करून घेतले.

अध्यक्षीय भाषणात प्रा. वंदना पुजारी यांनी ज्ञानाबरोबरच संस्कारही तितकेच महत्त्वाचे असल्याचे सांगत, विद्यार्थ्यांनी शिबिरातील विविध उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमास संस्था क्रीडा विभाग प्रमुख व प्राचार्य अरुण वावरे उपस्थित होते.

दि. २३ ते ३० एप्रिल दरम्यान चालणाऱ्या या शिबिराचे आयोजन उपप्राचार्या सौ. अंजली चिंतामण व पर्यवेक्षक अनिल मगर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. शिबिरात ८० मुले व ७० मुली सहभागी झाले आहेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुरेश भापकर यांनी केले. सूत्रसंचालन सर्जेराव निकाळजे यांनी, तर आभार प्रदर्शन प्रभाकर मराठे यांनी केले. अशोक आघवणे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

क्रीडाशिक्षक ज्ञानेश्वर तहकिक, सादिक शेख, कला शिक्षिका शीतल गोरे तसेच शिबिरार्थींच्या अल्पोपहाराची व्यवस्था पाहणारे आत्माराम झरेकर, सुभाष बर्डे, देविदास रणदिवे आणि आयोजन समितीतील अक्षय पुरनाळे, किरण गोरे, धनश्री धट, शेख नाफिया, गायके संपदा यांनी कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन केले.



# पाणी बचतीसाठी बाष्पीभवन कमी करण्याच्या उपाययोजना आवश्यक

## सुखदेव फुलारी । पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवड्यानिमित्त शेतकरी परिसंवाद

**● नेवासा । वीरभूमी –** बाष्पीभवनामुळे शेती व शेततळ्यातील पाणी मोठ्या प्रमाणात वाया जाते. ते टाळण्यासाठी पाण्याचे बाष्पीभवन कमी करणाऱ्या उपाययोजना राबविणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन जलसाक्षरता केंद्र यशदा यांचे जिल्हा समन्वयक जलमित्र सुखदेव फुलारी यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या मुळा पाटबंधारे विभागातर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवड्यानिमित्त गुरुवार, दि. २३ एप्रिल रोजी भेंडा येथील जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयाच्या सभागृहात पीक पद्धतीबदल, उत्पादकता वाढ व पाण्याचे नियोजन या विषयावर शेतकरी परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. यावेळी 'पाणी बचतीत शेतकऱ्यांचा सहभाग' या विषयावर मार्गदर्शन करताना फुलारी बोलत होते.

मुळा पाटबंधारे विभागाचे उपअभियंता संदीप पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक अशोकराव मिसाळ, कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ राहुल पाटील, सहाय्यक कृषी अधिकारी गणेश अटक, प्रगतशील शेतकरी भाऊराव आगळे, डॉ. भास्कर तात्कटे, विरसेन पवार, किशोर मिसाळ, मंगेश नवले, नेवासा उपविभागाचे उपविभागीय अधिकारी अभिषेक पवार तसेच चिलेखनवाडी उपविभागाचे उपविभागीय अधिकारी स्वप्नील देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे व जलकलशाचे पूजन करण्यात आले. महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली, तर कालवा निरीक्षक रावण ससाणे यांनी जलगीत सादर केले.

सुखदेव फुलारी पुढे म्हणाले की, नागरीकरण, औद्योगिक वापर आणि सिंचन यामध्ये शेतकरी हा सर्वात मोठा पाणी वापरकर्ता आहे. पाणी नसल्यास शेती आणि अन्नधान्य उत्पादन अशक्य आहे. त्यामुळे कालवा व भूजलाच्या माध्यमातून मिळणारे पाणी काटकसरीने वापरणे आवश्यक आहे. पारंपरिक प्रवाही सिंचन पद्धतीऐवजी सूक्ष्म सिंचनाचा अवलंब केल्यास सुमारे ४० टक्के पाण्याची बचत होते. तसेच शेततळे व शेतीतील पाण्याचे ५० टक्क्यांपर्यंत बाष्पीभवन होत असल्याने त्यावर नियंत्रणासाठी विविध उपाययोजना करणे गरजेचे आहे.

कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ राहुल एस. पाटील यांनी कमी पाण्यातील ऊस शेती या विषयावर मार्गदर्शन करताना सांगितले की, अति पाणी वापराचे दुष्परिणाम स्पष्टपणे दिसत आहेत. पिकाच्या गरजेनुसार पाणी देण्याचे नियोजन महत्त्वाचे आहे. पाऊसमान, तापमान, सूर्यप्रकाश, वाऱ्याचा वेग व आर्द्रता हे घटक पाण्याच्या गरजेवर परिणाम करतात. आच्छादन तंत्रज्ञान, पुसा हायड्रोजेल व सिलिकॉनचा वापर बाष्पीभवन कमी करण्यासाठी प्रभावी ठरतो. ठिबक सिंचनाचा शास्त्रोक्त वापर केल्यास उत्पादनवाढीस मदत होते. ऊस शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर केल्यास पाणी व खत खर्चात बचत होऊन सुमारे ३० टक्के अधिक उत्पादन मिळू शकते.



प्रगतशील शेतकरी भाऊराव आगळे यांनी एकरी १०० टन ऊस उत्पादनाची यशोगाथा सांगताना व्यवसायिक दृष्टिकोनातून शेतीत बदल करण्याचे आवाहन केले. योग्य मशागत, बेणे प्रक्रिया, रासायनिक खतांचा मर्यादित वापर व जैविक खतांचा अवलंब केल्यास उच्च उत्पादन शक्य असल्याचे त्यांनी सांगितले.

सहाय्यक कृषी अधिकारी गणेश अटक यांनी फळबाग व्यवस्थापनावर मार्गदर्शन करताना फळबाग हा कमी पाण्यात अधिक उत्पन्न देणारा पर्याय असल्याचे सांगितले. केओलिन पावडरचा वापर सनबर्न रोखण्यासाठी प्रभावी असून मल्चिंगमुळे पाण्याची बचत होते, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास मुळा पाटबंधारे विभागाचे शाखाधिकारी बिरबल दरवडे, जितेंद्र कावले, प्रवीण नागपुरे, कालवा निरीक्षक श्रीकांत करंजे, सुनील तुपे, नितीन लांडे, ज्ञानदेव पाडळे, बाबुराव म्हस्के, लहू खाटीक, योगेश फुलारी आदींसह मुळा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित शेतकऱ्यांना ज्ञानेश्वर कृषी विज्ञान केंद्राच्या माती-पाणी परीक्षण व जैविक प्रयोगशाळेला भेट देण्यात आली. यावेळी डॉ. भास्कर तात्कटे, श्री. काकडे व विजय गव्हाणे यांनी माहिती दिली.

मुळा पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी स्वप्नील देशमुख यांनी प्रास्ताविक केले. कालवा निरीक्षक संतोष राऊत यांनी सूत्रसंचालन केले, तर श्री. रजपूत यांनी उपस्थितांना जलप्रतिज्ञा दिली. कार्यक्रमाचा समारोप शाखाधिकारी प्रदीप खर्से यांनी आभार प्रदर्शनाने झाला.

# 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव अभियान' जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येणार

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' हा राज्यस्तरीय महत्त्वाकांक्षी कार्यक्रम असून या अभियानामध्ये अहिल्यानगर जिल्हा सक्रिय सहभाग घेत आहे. राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, आनंद भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे यांनी दिली.

या अभियानाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीमध्ये राज्यस्तरीय उद्घाटन नुकतेच पार पडले असून कार्यक्रमाबाबत कार्यशाळाही संपन्न झाली आहे. या अभियानांतर्गत ग्रामस्तरावर आरोग्य निर्देशांक सुधारण्यासाठी विविध आरोग्य विषयांवर लक्ष केंद्रित करण्यात येणार असून त्यामध्ये संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे नियंत्रण, माता व बाल आरोग्य सेवा बळकटीकरण तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी यांचा समावेश आहे. संसर्गजन्य आजारांमध्ये कुष्ठरोग, क्षयरोग, जलजन्य आजार तसेच किटकजन्य आजार जसे की डेंग्यू व मलेरिया यांचे नियंत्रण करण्यावर भर देण्यात येणार आहे. तसेच असंसर्गजन्य आजारांमध्ये मधुमेह, उच्च रक्तदाब व कर्करोग या आजारांच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी उपाययोजना राबविण्यात येतील.

माता व बाल आरोग्य अंतर्गत प्रसूतिपूर्व व प्रसूतिपश्चात सेवा, लसीकरण, कुटुंब कल्याण, कुपोषण निर्मूलन तसेच अति जोखमीच्या मातांची विशेष काळजी घेण्यात येणार आहे. याशिवाय शुद्ध पाणीपुरवठा, स्वच्छता राखणे, जैविक कचरा व्यवस्थापन, प्रदूषण नियंत्रण व वृक्ष लागवड या प्रतिबंधात्मक उपाययोजनांवरही भर दिला जाणार आहे. ग्रामपंचायतींचे मूल्यमापन निश्चित निर्देशांकांच्या आधारे करण्यात येणार असून एकूण १०० गुणांपैकी ७० पेक्षा अधिक गुण प्राप्त करणाऱ्या ग्रामपंचायतींना आरोग्य संपन्न ग्राम म्हणून गौरविण्यात येणार आहे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना राज्य, विभाग व जिल्हास्तरावर पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. यामध्ये राज्यस्तरावर प्रथम क्रमांक ५ कोटींचे बक्षीस देऊन गौरविण्यात येणार असून द्वितीय क्रमांक ३ कोटी तर तृतीय क्रमांक २ कोटी रुपयांचे पारितोषिक देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

# आरोग्य व्यवस्थेत केमिस्ट बांधवांचे मोठे योगदान

## ना. राधाकृष्ण विखे पाटील । केमिस्ट भवनला पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने बुरुडगाव रोड येथे उभारण्यात आलेल्या नूतन केमिस्ट भवनाला पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी भवनाच्या उभारणीबद्दल समाधान व्यक्त करत केमिस्ट बांधवांचे कौतुक केले.



विखे पाटील म्हणाले की, केमिस्ट बांधव केवळ औषध व्यवसायापुरते मर्यादित न राहता समाजकार्यातही महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. नागरिकांच्या आरोग्य व्यवस्थेत त्यांचे योगदान मोठे असून, या माध्यमातून ते समाजाशी जोडलेले आहेत. शहरात अनेक दिवसांपासून अपेक्षित असलेले केमिस्ट भवन आज साकार झाले असून, ही बाब अत्यंत समाधानकारक असल्याचे त्यांनी नमूद केले.

या नूतन भवनामुळे केमिस्ट बांधवांना एकत्र येण्यासाठी सक्षम व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. भविष्यात हे भवन संवाद, नियोजन आणि प्रशिक्षणासाठी केंद्रबिंदू ठरेल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. तसेच या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रमांना चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर यांनी पालकमंत्र्यांचे स्वागत करत भवनाच्या उभारणीची सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, या भवनामुळे संघटनेच्या कामकाजाला अधिक गती मिळणार असून, केमिस्ट बांधवांमधील समन्वय आणि एकजूट अधिक दृढ होणार आहे. विविध सामाजिक व व्यावसायिक उपक्रमांना चालना मिळणार असून, केमिस्ट बांधवांच्या प्रगतीसाठी हे भवन महत्त्वाचे केंद्र ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमास भाजपचे जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक निखील वारे, पै. महेश लोंढे, शहर उपाध्यक्ष भरत सुपेकर, शहर सचिव मनिष सोमाणी, शहर खजिनदार मनोज खेडकर, शहर सहसचिव मनिषा महेश आठरे, माजी अध्यक्ष संजय गुगळे, संचालक नितीन सातपुते, सागर फुलसौंदर, अनिल क्षीरसागर, कमलेश गुंदेचा, युवराज खेडकर यांच्यासह संकेत गुरव, युवराज गुंजाळ, अमोल घोरपडे आदींसह केमिस्ट बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोहटादेवीच्या कृपेने सालबर्डी चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरेल

## निर्माते अनिल देवडे । अंधश्रद्धेविरुद्ध प्रभावी कथानक; मोहटादेवीच्या दर्शनाने टीमचा उत्साह द्विगुणित

**● पाथर्डी । वीरभूमी–** मोहटादेवी गडाचे स्थान अत्यंत जागृत असून निसर्ग पर्यटन व धार्मिक दृष्ट्या हा परिसर अतिशय समृद्ध आहे. या ठिकाणी आगामी मालिका अथवा मराठी चित्रपटांचे चित्रीकरण करण्याचा प्रयत्न करू, असे मत व्यक्त करण्यात आले. सालबर्डी हा चित्रपट अलीकडील काळात प्रदर्शित झालेल्या दर्जेदार मराठी चित्रपटांच्या तोडीचा असून मोहटादेवीच्या कृपेने तो निश्चितच प्रेक्षकांच्या पसंतीस उतरेल, असा विश्वास दिग्दर्शक रमेश चौधरी यांनी व्यक्त केला.

चित्रपटाचे कथानक जिल्ह्यातील चांदा बाल हत्याकांडावर आधारित आहे. अंधश्रद्धा व भोंदूगिरीविरुद्ध आवाज उठवत समाजप्रबोधनाचा संदेश देणारे हे कथानक अत्यंत प्रभावी आहे. वलयांकित कलाकार, उत्कृष्ट दिग्दर्शन आणि प्रभावी सादरीकरणामुळे अवघ्या आठ दिवसांतच राज्यभर या चित्रपटाचे जोरदार स्वागत झाले आहे.

बीड जिल्ह्यातील दौरा आटोपून पुण्याकडे जाताना सालबर्डीच्या टीमने मोहटादेवीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी पोस्टर प्रदर्शन करून भाविकांशी संवाद साधला. चित्रपटाचे निर्माते अनिल देवडे पाटील व राम जाधव, दिग्दर्शक रमेश चौधरी, कलाकार कमलाकर सातपुते, अनिल नगरकर व रोहित कोकाटे यांनी देवीची महापूजा केली.

या प्रसंगी पाटबंधारे विभागाचे सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता अशोक खेडकर, जगदंब प्रतिष्ठानचे संस्थापक ॲड. प्रतीक खेडकर, देवस्थान समितीचे विश्वस्त बाळासाहेब लाहोटी व अशोक खेडकर, पंचायत समिती कृषी विभागाचे कर्मचारी ओमप्रकाश दहिफळे, देवस्थान समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, मुख्य लेखाधिकारी संदीप घुले आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी कमलाकर सातपुते म्हणाले की, मोहटादेवीचे मंदिर अत्यंत भव्य व स्वच्छ असून मनाला प्रसन्न करणारे आहे. येथे चैतन्यशक्तीची अनुभूती येते आणि देवीचे स्थान जागृत असल्याचा प्रत्यय लगेचच येतो. सालबर्डी चित्रपटाला प्रेक्षकांकडून भरभरून प्रेम मिळत असून कलाकारांनीही मोठी मेहनत घेतली आहे. देवीच्या आशीर्वादामुळे चित्रपट रसिकांना नक्कीच समाधान देईल.

निर्माते राम जाधव म्हणाले की, शाहू, फुले आणि आंबेडकरांचा महाराष्ट्र अंधश्रद्धेकडे झुकत असल्याची चिंता प्रत्येक सुजाण नागरिकाला वाटते. सशक्त महाराष्ट्र घडवण्यासाठी बुद्धीनिष्ठ जीवनशैलीच शाश्वत आहे, हा संदेश या चित्रपटातून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.



निर्माते अनिल देवडे पाटील यांनी सांगितले की, राज्यातील प्रमुख देवस्थानांपैकी मोहटादेवी देवस्थान अत्यंत जागृत म्हणून प्रसिद्ध आहे. देवीच्या कृपेने प्रत्येक संकल्प पूर्ण झाला असून चित्रपट निर्मितीचाही संकल्प यशस्वी झाला आहे. नामवंत गायकांच्या स्वरात मोहटादेवीची आरती आणि काही दृश्यांचे चित्रीकरण करण्याचा मानस आहे.

राज्यातून मोठ्या प्रमाणावर भाविक येथे येतात आणि त्यांच्यापर्यंत चित्रपट पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. सोशल मीडिया व मोबाईलमुळे चित्रपटप्रेमी कमी होत असले तरी प्रेक्षकांच्या प्रतिसादाने मराठी चित्रपटसृष्टीला नवसंजीवनी मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सालबर्डीची संपूर्ण टीम सेवाभावी, कष्टाळू आणि कलेची उत्तम जाण असलेली आहे.

मराठी चित्रपटसृष्टीत अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकरी कुटुंबातील तरुणाने केलेल्या धाडसी पदार्पणाचे सर्वत्र कौतुक होत असून हा यशस्वी प्रयत्न संपूर्ण टीमच्या सहकार्यामुळेच शक्य झाला, असेही देवडे यांनी नमूद केले.

देवस्थान समितीच्या वतीने विश्वस्त बाळासाहेब लाहोटी व अशोक दहिफळे यांनी स्वागत केले, तर जगदंब प्रतिष्ठानचे संस्थापक ॲड. प्रतीक खेडकर यांनी आभार मानले.